ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017
१९६६-२०१६
सुवर्ण महोत्सवी वर्ष

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's
**Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College**
Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204.
■ NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL ■

Special Issue, December 2017
**Printing Area**™
International Multilingual Research Journal


IMPACT FACTOR 4.002 IIJIF



# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : I)

Chief Editor
Dr. Anant Madan Awati



Scanned with CamScanner

41)भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह भ्रष्टाचार : समस्या आणि उपाय
प्रा. डॉ. हेमलता म. भानसार,जि.बुलढाणा, || 133

42)नतीच्या पैशाचा राजकारणातील हिस्सा
प्रा.डॉ. व्ही. एस. इंगळे, जि. यवतमाळ || 136

43)भ्रष्टाचार काळा पैसा, राजकारणात पैशाचा वापर आणि राजकारणातील गुन्हेगारी
भगवंत शिवाजी भुकरे, जि.यवतमाळ, || 140

44)भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह — राजकारणाचे गुन्हेगारीकरण
प्रा.डॉ.सविता गेबले, अमरावती. || 143

45)भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार
प्रा.डॉ.रमेश बी. सुरळकर, जि. बुलढाणा || 147

46)राजकारण आणि गुन्हेगारीत–भ्रष्टाचार आणि काळ्या पैशाचा उपयोग
प्रा. डॉ. शिवराम प्र.उबाळे, जि.बुलढाणा. || 150

47)अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने नक्षलवादाचे मोठे आव्हान
प्रा.डॉ.प्रशांत विघे, जि. अमरावती || 153

48)नक्षलवाद: नक्षलवाद उदय आणि विकास
प्रा.डॉ.शेटे आर.बी., जि.नांदेड. || 158

49)नक्षलवाद : आधुनिक भारतासमोरील आव्हान
आकाश शेषराव बांगर, हिंगोली || 161

50)भारतामधील महाराष्ट्र राज्यामधील नक्षलवाद एक समस्या
सहा. प्रा. डॉ उमेश आर. घुमाळे, आकोट || 164

51)नक्षलवादाचा इतिहास
सहा.प्रा.नासीर कासम शेख, जि. यवतमाळ || 166

52)नक्षलवाद आणि राजकीय हिंसा
प्रा. अविनाश फाळके, जि. यवतमाळ. || 169

53)नक्षलवाद : भारतासमोरील एक आव्हान
प्रा.सचिन जयस्वाल, जालना. || 172

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot...

Sant Gadgebaba Jadhav Maha... 330



Scanned with CamScanner

जनतेचा शासनावरील विश्वास डळमळीत होण्याची शक्यता अधिक असते.

सर्वाधिक महत्वाचे म्हणजे मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावण्यापूर्वी किमान वासंके ।ीची खबरदारी घ्यावी की, सभागृहात त्यांच्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारा लोक प्रतिनीधी चारित्र्यवान,प्रामाणिक व कार्यक्षम असावा.

तात्पर्य एवढेच की,राजकारणातील गुन्हेगारीकरणावर नियंत्रण प्रस्थापित करण्याची जबाबदारी एकटे निर्वाचन आयोग सर्वोच्च न्यायालय किंवा तत्सम संस्थांची नसून खरी जबाबदारी राजकीय पक्ष आणि मतदार संघ या दोघांची आहे. या उक्तीप्रमाणे निवडणूक काळातच जर राजकीय पक्षांनी अश्या उमेदवारांना तिकीट नाकारले आणिं मतदारांनी विवेकबुध्दीचा वापर करुन मतदानाचा हक्क वापरल्यास याला आपोआपच खीळ बसेल.

**संदर्भ :**


१)असोसिएशन फॉर डेमोक्रेटीक रिफार्म,लोकसभा चूनाव २०१४,नवनिर्वाचीन सांसदोंके जानकारी का विश्लेषण पेज २,१८ मई २०१४ www. adrindia.org.

2)Analysis of criminal,financial and other background details of union council of minister post cabinet expansion on 9th nov.2014, ADR Report on 16th Loksabha, page 3, 2010 Nov.

३)Maharashtra Election watch,ADR, 13 Dt.2014.

४)तत्रैव पृ. —२

५) झी न्युज इंडीया कॉम,www.dnaindia.com.> india news Jan 25,2017

६)तत्रैव पृ. —५

७) सर्वोच्च न्यायालय के ऐतिहासिक फैसले भारतीय राजनिती https //hindi.news.com. July,2013.

८) India express, 442 Crorepatatis Richect worth Rs.6.83 core.Published by Indian express Dt.may 19, 2014.

९) The Hindu, Artical written by Ruchimini


45

# भारतीय लोकशाहीतील भ्रष्टाचार


प्रा.डॉ.रमेश जी. सुरळकर,
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय,
मेहकर, जि. बुलडाणा


************

भारतीय लोकशाही व्यवस्थेसमोर भ्रष्टाचार नेहेमीच एक आव्हान ठरलेले आहे. भ्रष्टाचाराने असे एकही क्षेत्र सोडलेले नाही, की त्या क्षेत्रात भ्रष्टाचार हा शिरलेला नाही. त्यामध्ये भारतीय संसद ते कार्यकारी मंडळ ते न्याय मंडळ, तसेच प्रशासन आणि औद्योगिक क्षेत्रही. या संपूर्ण क्षेत्राला भ्रष्टाचाराने व्यापून घेतलेले आहे. हया संस्था आणि क्षेत्र भ्रष्याचारापासून वाचु शकलेल्या नाहीत. स्वातंत्र्यानंतर काही वर्षानी राजकारणाचे सत्ताकारण होउन त्यास अत्याधिक महत्व आलेले दिसते ., भारताची संरक्षण व्यवस्था किंवा संरक्षण दल भ्रष्टाचारापासून सुटलेले नाहीत .यातुन असा निष्कर्ष निघतो की, भारतातील सर्वच संस्था ही भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडलेल्या दिसतात. या देशात भ्रष्टाचार व्यापक फोफावलेला आहे. व अत्यंत अकार्यक्षम अशी कारभाराची व्यवस्था निर्माण झालेली आहे. त्यामुळे अनेक दुराग्रही प्रवृत्ती प्रभावीपणे आपली पायमुळे पसरवीत आहेत. हे भारतीय लोकशाहीसमोर एक आव्हान .आहे.

**भ्रष्टाचाराचा अर्थ:**

डी.डी एच.बेली यांच्या मते — भ्रष्टाचार म्हणजे काही औपचारिक नियम व कायद्याचे उल्लंघन करून स्वत:चा स्वार्थ साधने होय. हा स्वार्थ केवळ पैशाच्या स्वरूपातच असतो असे नाही.

जगातल्या १७८ भ्रष्ट देशांपैकी भारताचा ९५ वा क्रमांक लागतो भ्रष्टाचार हा रोजच्या व्यवहारीक जीवनाचा भाग झालेला आहे. सीबीआयचे संचालक ए.पी.सींग यांनी या देशातील २५०० कोटी रुपये

विदेशी बँकामध्ये असल्याची माहिती जाहीर केली. विकीलिक्स या वादग्रस्त संकेतस्थळाचे संस्थापक ज्युलीयन असांज यांनी दावा केला आहे की, स्वीस बँकामध्ये इतर कोणत्याही देशाच्या तुलनेमध्ये भारतीय नागरीकांचा पैसा जास्त आहे.

यांच्या ही पुढे जाउन स्वीस बँकेच्या संचालकाने असे मत व्यक्त केले की, भारतीय लोक गरीब आहेत परंतु भारत देश गरीब नाही. त्यांच्या मते भारतातील काही लोकांचे २८० लाख कोटी रूपये स्वीस बँकेत आहेत. हे २८० लाख कोटी रूपये जर भारतात परत आणले तर पूढची ३० वर्षे संपुर्ण भारतीयांना प्राप्तीकर द्यावा लागणार नाही. वरील रकमेतून ६० कोटी भारतीयांना रोजगार मिळू शकेल.भारतीयांना चांगल्या प्रतिचे आणि मोफत शिक्षण मिळू शकेल. भारतातील ६००० खेडयांना चार पदरी रस्त्यांना जोडता येईल. आज भारतात विजेचे संकट आहे. परंतु या पैशाने देशाला विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करता येईल तसेच ५०० पेक्षा जास्त प्रकल्पांना विज मोफत देता येईल. भारत प्रत्येक भारतीयांना २००० रूपये प्रती माह ६० वर्षापर्यंत देउन शकेल. जागतीक बँक व आंतराष्टभीय नाणेनिधीच्या कर्जाची आवश्यकता भासणार नाही. पेटभोल १५ रूपये लिटर व डिझेल ८ रूपये प्रति लिटर देता येईल.

भ्रष्टाचार करण्यात अग्रेसर असणा—यांमध्ये राजकीय पक्षाचे नेते, मंत्री , आमदार, खासदार किंवा इत्तर लोकप्रतिनिधी आघाडीवर असतात. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकारी, निमशासकीय अधिकारी, निरनिराळ्या सहकारी संस्थांचे संचालक, शैक्षणिक संस्थांचे संचालक, बँकाचे संचालक हेही भ्रष्टाचार करत असतात. वकील, इंजिनीयर, डॉक्टर, बिल्डर, उद्योजक असे अनेक कायद्यातील पळवाटा शोधून भ्रष्टाचाराला खतपाणी घालीत असतात. स्वातँयोत्तर काळात भारताच्या राजकीय क्षेत्रात अनेक भ्रष्टाचार झाल्याचे उदाहरणे आहेत. त्यातील काही निवडक घोटाळे आहेत. त्याची सुची पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**भ्रष्टाचाराची कारणे :**

१.भारताची राजकीय व्यवस्था पुर्णपणे भ्रष्ट झालेली आहे.

२.शासकीय ,निमशासकीय ,खाजगी ,अशा सर्वच क्षेत्रात वशिलेबाजीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे.

३. प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांच्या मनात लाच घेतांना आणि देतांना कसलीही नैतिकता राहलेली नाही.

४.भारतात बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे.

५.निवडणूकीतील अफाट खर्च हे भ्रष्टाचार वाढीचे एक प्रमुख कारण आहे.

६ निरक्षरता हे सुध्दा भ्रष्टाचार वाढीमागील एक प्रमुख कारण आहे.

७.अनेक क्षेत्रात कर्मचाऱ्यांना कमी किंवा तटपुंजे वेतनावर काम करावे लागते त्यामुळे भ्रष्टाचार वाढतो.

८.सरकारी योजना मध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार केला जातो.

९.किचकट सरकारी धोरणामुळे भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबिला जातो

**भ्रष्टाचाराची महत्वपुर्ण प्रकरणे :**

भारतात भ्रष्टाचार, घोटाळे, गैरव्यवहार हे स्वातंय मिळाल्यानंतर सुरू झाले आहेत. स्वातंय मिळाल्यावर भ्रष्टाचारी नेत्यांना आणि सरकारी बाबुंना पैसा चरण्यासाठी आयते कुरणच मिळाले.भारतातील घोटाळयांच्या रकमेची बेरीज केली तर आतापर्यत ७६७ लाख कोटीचा भ्रष्टाचार झाला आहे.

दिल्लीत झालेल्या राष्टभकुल क्रीडा स्पर्धेतील ७० हजार कोटी रूपयांचा घोटाळा , मुंबईतील आदर्श सोसायटीच्या इमारतीचा घोटाळा यावरून देशभरात राजकीय भूकंपाचे धक्के सुरू असतानाच दूरसंचार मंत्रालयातील २—जी स्पेक्टभम वाटपातून झालेला १.७६ लाख कोटी रूपयांचा घोटाळा उघडकीस येताच केंद्रासह महाराष्टभात राजकीय उलथापालथ झाली. या विविध घोटळयांनी देशातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक वातावरण पार ढवळून निघाले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील घोटाळे आणि स्विस बँकेतील रकमेची बेरीज केलीतर ती सूमारे ७६८ लाख कोटी रूपयांवर जाउन पोहचली आहे. स्वातंयोतर काळातील आतापर्यतचा सर्वात मोठा घोटाळा म्हणूनच, २—जी स्पेक्टभम घोटाळयाची नोंद झाली .त्या पाठोपाठ उत्तरप्रदेशात २

लाख कोटींचा शिधावाटप घोटाळा झाल्याचे उजेडात येत आहे. हा शिधावाटप घोटाळा फक्त उत्तर प्रदेश पुरता मर्यादित नसून तो सर्व देशभरात पसरलेला आहे. देशात आज बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची व्याप्ती आणि हीडिस स्वरूप पहिले तर प्राणाचे बलिदान देऊन, घरावर तुळशीपत्र ठेवून, स्वतःच्या संसाराची राखरांगोळी करून आणि रक्ताचे सिंचन करून भारतीय स्वातंत्र्याची बाग फुलविली त्या हुतात्म्यांच्या देशाच्या भाग्यविधात्याच्या स्वप्नाच्या ठिणग्या करण्यासाठी भ्रष्टाचाऱ्यांनी आवतार घेतला आहे काय ? असा प्रश्न पडतो .देशात सन १९९१ पासून खासगीकरण, उदारी करण आणि जागतिकीकरणा चे वारे वाहू लागले तेव्हापासून देशात ३०८ लाख कोटी रूपयांचे आर्थिक घोटाळे झाले आहे. ठेवी ठेवल्या आहेत तर १९४८ पासून बडया कंपन्यानी आणि ध निकांनी २१ लाख कोटी रूपयांच्या करांची बुडवेगिरी केली आहे. सत्ता धारी , राजकीय नेते, नोकरशहा , उद्योगपती यांच्या संगनमताने ही लाचखोरी, भ्रष्टाचार आणि करबुडवेगिरी झाली आहे. देशाचा महसूल बुडविणे हा देशद्रोहच ठरतो. याबाबतच्या काही सर्वेक्षणात असे मानले गेले, की जगात एकंदर ५१६ लाख कोटी काळा पैसा आहे. यामध्ये भारतीयांचा एकंदर काळा पैसा ३०८ लाख कोटी म्हणजेच निम्म्यापेक्षाही जास्त आहे.

आजचा भारताचा वृद्धिदर हा ८ टक्क्यांच्या आसपास आहे. तो अनेक वेळा कमी—जास्त झालेला आहे. आपण काळा पैसा भारतात आणल्यास आपला वृद्धिदर हा २० टक्के पर्यंतवाढेल, ऐवढा समृध्द झाल्यास सरकारला जनतेवर कोणतेच कर लावावे लागणार नाही. कर नसल्यामुळे आपोआपच काळा पैसा संपुष्टात येईल. हा काळा पैसा वापरात आला तर निश्चित भारताचे माजी राष्ट्रपती मा. ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी म्हटल्याप्रमाणे भारत लवकरच जगाचे नेतृत्व करू शकेल.

**भ्रष्टाचारावरील उपाय योजना:**

१.राजकीय नेत्यांच्या सांपत्तीक स्थितीची चौकशी आयकर खात्यातर्फे सतत व्हायला पाहीजे.

२.गुन्हेगारास उमेदवारी देणा—या पक्षाची मान्यता काढून घेण्यासाठी नियम तयार करण्यात यावे.

३.प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता असायला हवी. नागरिकांना माहिती जाणून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला असला तरी त्याची अंमलबजावणी नीट होत नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकाराची योग्य अमलबजावणी व्हायला हवी.

४.भ्रष्टाचारी खटले चालविण्यासाठी स्वतंत्र न्यायालयाची व्यवस्था असावी.

५.भ्रष्टाचारी व्यक्तींना त्वरीत शिक्षा मिळावी.

६.योग्य व प्रामाणिक व्यक्तींची पदावर नियुक्ती करणे.

७.विदेशातील जमा काळा पैसा शासनाने परत आनणे.

८.राजकीय नेत्यांचा पोलिस प्रशासन व न्यायव्यवस्थेमधील हस्तक्षेप रोखणे

९.बेरोजगारीचे प्रामाण कमी करणे.

१०.राजकीय गुन्हेगारीकरण रोखण्याकरिता गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना निवडणूका लढविण्यास बंदी घालणे.

संदर्भ :

१.भारत का संविधान. विधी व न्याय मंत्रालय ,भारत सरकार, २०११.

२.योजना ;नियतकालिकद्ध प्रकाशन विभाग, भारतसरकार .

३. प्रतियोगिता दर्पण —ऑक्टोबर २०११.

४. भारतीय लोकशाही—स्थिती आणि गती —संपादक —डॉ. पंडीत नलावडे.

५. महितीचा अधिकार , मूल निवासी, प्रचार—प्रसार केंद्र, नागपूर , २०१०.

६.दैनिक सकाळ , डीसेंबर , २०१३.

७. राजकीय नेतृत्व ,डॉ.ना.रा.खेकाळे ,श्री मंगेश प्रकाशन,नागपूर, १९९९.

Smt.Sindhutai Jadhao Maha. Mehkar 330

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned with CamScanner